( ६ )

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र.३५ /का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३०/१२/२०१५.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,

विषय:- महानगरपालिका, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणुका-२०१७ निवडणुकांकरिता निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निरीक्षक, मतदान केंद्राध्यक्ष व झोनल ऑफिसर, इत्यादी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत...

महोदय,

मार्च-एप्रिल-२०१७ मध्ये १५ महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणाऱ्या २९६ पंचायत समित्यांच्या मुदती संपत आहेत. सदर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तत्पूर्वी घेणे आवश्यक आहे. या निवडणुकांकरिता उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येते. अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्याची निवडणूक निरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात येते. मतदान केंद्राध्यक्ष व झोनल ऑफिसर म्हणून विशिष्ट दर्जाचे अधिकारी आवश्यक असतात. अशा आवश्यक असणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांचा तपशील सोबतच्या प्रपत्रात दर्शविलेला आहे. आपल्या महसूल विभागात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता आवश्यक असणाऱ्या निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणूक निरीक्षक, मतदान केंद्राध्यक्ष व झोनल ऑफिसर, इत्यादी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आपली आहे. तरी सदर निवडणुकांकरिता योग्य त्या दर्जाचे अधिकारी वेळीच उपलब्ध होतील याबाबत आतापासून नियोजन करणे आवश्यक आहे.

२. आपल्या विभागामध्ये सन २०१७ मध्ये होणाऱ्या महानगरपालिका व जिल्हा परिषद / पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी किती उपजिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाचे अधिकारी आवश्यक आहेत याबाबतचे एकत्रित विवरणपत्र-१ सोबत जोडले आहे. त्यानुसार आपल्या विभागात कार्यरत असलेल्या तसेच रिक्त असलेल्या उपजिल्हाधिकारी / अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांचा आढावा तात्काळ घ्यावा. जी पदे रिक्त आहेत ती आगामी सार्वत्रिक बदल्यांच्या दरम्यान निश्चितपणे भरण्यात येतील याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे ज्या महसूल अधिकाऱ्यांची तीन वर्षांपेक्षा जास्त सेवा झालेली आहे, त्यांच्या बदल्यादेखील यादरम्यान होतील याकडेही लक्ष द्यावे.

३. सदर निवडणुकांकरिता जानेवारी, २०१७ मध्ये पुरेशा प्रमाणामध्ये उपजिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी उपलब्ध राहतील याची खबरदारी घ्यावी. यासंदर्भात आवश्यक असलेल्या अधिकाऱ्यांची संख्या, मंजूर असलेल्या पदांची संख्या, त्यापैकी रिक्त पदांची संख्या, कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची संख्या व बदलीस पात्र होणाऱ्या अधिकाऱ्यांची संख्या यांच्या आकडेवारीसह केलेल्या नियोजनाची माहिती राज्य निवडणूक आयोगास दि.१३/०१/२०१६ पर्यंत कळवावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

30-12-2015

( डॉ. प्रदीप व्यास )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

f:\महानगरपालिकांची पत्रे\महानगरपालिका निवडणुकीची पत्रे.docx

प्रपत्र

| SR. NO. | LOCAL BODY | RETURNING OFFICER | PRESIDING OFFICER | POLLING OFFICER | ZONAL OFFICER | OBSERVER |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MUNICIPAL CORPORATION | 1 for 10 to 12 wards | 1 - PER POLLING STATION (NO. OF P.S. AS PER 1200-1400 VOTERS) | 3 - PER POLLING STATION | 1- PER PREMICES OR NEARBY PERIPHERI | 1- FOR WARDS UNDER 3 Ros |
| | | Not Below The Rank Of Deputy Collector Bye ele- Asstt. Commr | Office suprintendent / Headmaster / Senior Teacher / J. E. / Tax inspector | Clerk / Teacher or staff from Class- 3 cadre | Deputy Engineer / Section Engineer / J. E. / Administrative Officer / Sanitory Officer / Senior Tax inspector Equivalent to A.R.O. OR below his rank | Additional Collector Level Officer |
| 2 | ZILLA PARISHAD | 1- PER TAHASIL (Not Below The Rank Of Deputy Collector) | 1 - PER POLLING STATION (NO. OF P.S. AS PER 800 VOTERS) | 3 - PER POLLING STATION | 1- PER PREMICES OR NEARBY PERIPHERI | 1 for 3 to 4 Tahasils |
| | | Not Below The Rank Of Deputy Collector Bye ele-Tahasildar | Headmaster / Senior Teacher / Junior Engineer | Clerk, Primary / Asstt. Teacher, Extension Officer | Officer from Group-B Equivalent to A.R.O. OR below his rank | Additional Collector Level Officer |
| 3 | PANCHAYAT SAMITI | 1- PER TAHASIL (Not Below The Rank Of Deputy Collector) | 1 - PER POLLING STATION (NO. OF P.S. AS PER 800 VOTERS) | 3 - PER POLLING STATION | 1- PER PREMICES OR NEARBY PERIPHERI | 1 for 3 to 4 Tahasils |
| | | Not Below The Rank Of Deputy Collector Bye ele-Tahasildar | Headmaster / Senior Teacher / Junior Engineer | Clerk, Primary / Asstt. Teacher, Extension Officer | Officer from Group-B Equivalent to A.R.O. OR below his rank | Additional Collector Level Officer |
| Though the level of Presiding officer and polling officer is not specified care is taken that higher scale person is appointed as PRO than PO | | | | | | |

विवरणपत्र - 9

सन २०१७ म[illegible] गाऱ्या महानगरपालिका/ जिल्हा परिषदा / पंचायत समित्यांच्या निवडणु[illegible]ठी आवश्यक असलेल्या अधिकाऱ्यांची संख्या

| अ. क्र. | विभागीय आयुक्त | जिल्हा | महानगरपालिका | | | | जिल्हा परिषद / पंचायत समित्या | | | | एकूण अधिकारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महानगरपालिकेचे नाव | एकूण जागा | उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी | अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी | जि.प. संख्या | पं.स. संख्या | उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी | अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी | उपजिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी (६+१०) | अतिरिक्त जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी (७+११) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 1 | कोकण विभाग | मुंबई व मुंबई उपनगर | बृहन्मुंबई | 227 | 24 | 8 | | | | | 24 | 8 |
| 2 | | ठाणे | ठाणे | 130 | 12 | 5 | | | | | 12 | 5 |
| | | | उल्हासनगर | 78 | 8 | 2 | | | | | 8 | 2 |
| | | | भिवंडी-निजामपूर | 90 | 9 | 3 | | | | | 9 | 3 |
| 3 | | रायगड | | | | | 1 | 15 | 15 | 4 | 15 | 4 |
| 4 | | रत्नागिरी | | | | | 1 | 9 | 9 | 3 | 9 | 3 |
| 5 | | सिंधुदुर्ग | | | | | 1 | 8 | 8 | 2 | 8 | 2 |
| | | **एकूण** | | **525** | **53** | **18** | **3** | **32** | **32** | **9** | **85** | **27** |
| 6 | नाशिक विभाग | नाशिक | नाशिक | 122 | 12 | 4 | 1 | 15 | 15 | 4 | 27 | 8 |
| | | | मालेगाव | 80 | 8 | 2 | | | | | 8 | 2 |
| 7 | | जळगाव | | | | | 1 | 15 | 15 | 4 | 15 | 4 |
| 8 | | अहमदनगर | | | | | 1 | 14 | 14 | 4 | 14 | 4 |
| | | **एकूण** | | **202** | **20** | **6** | **3** | **44** | **44** | **12** | **64** | **18** |
| 9 | पुणे विभाग | पुणे | पुणे | 152 | 14 | 5 | 1 | 13 | 13 | 3 | 27 | 8 |
| | | | पिंपरी-चिंचवड | 128 | 12 | 4 | | | | | 12 | 4 |
| 10 | | सांगली | | | | | 1 | 10 | 10 | 3 | 10 | 3 |
| 11 | | सातारा | | | | | 1 | 11 | 11 | 3 | 11 | 3 |
| 12 | | सोलापूर | सोलापूर | 102 | 10 | 3 | 1 | 11 | 11 | 3 | 21 | 6 |
| 13 | | कोल्हापूर | | | | | 1 | 12 | 12 | 3 | 12 | 3 |
| | | **एकूण** | | **382** | **36** | **12** | **5** | **57** | **57** | **15** | **93** | **27** |
| 14 | अमरावती विभाग | अमरावती | अमरावती | 87 | 9 | 2 | 1 | 10 | 10 | 3 | 19 | 5 |
| 15 | | अकोला | अकोला | 73 | 8 | 2 | | | | | 8 | 2 |
| 16 | | बुलढाणा | | | | | 1 | 13 | 13 | 4 | 13 | 4 |
| 17 | | यवतमाळ | | | | | 1 | 16 | 16 | 4 | 16 | 4 |
| | | **एकूण** | | **160** | **17** | **4** | **3** | **39** | **39** | **11** | **56** | **15** |
| 18 | नागपूर विभाग | नागपूर | नागपूर | 145 | 14 | 4 | 1 | 13 | 13 | 4 | 27 | 8 |
| 19 | | वर्धा | | | | | 1 | 8 | 8 | 2 | 8 | 2 |
| 20 | | चंद्रपूर | चंद्रपूर | 66 | 6 | 2 | 1 | 15 | 15 | 4 | 21 | 6 |
| 21 | | गडचिरोली | | | | | 1 | 12 | 12 | 3 | 12 | 3 |
| | | **एकूण** | | **211** | **20** | **6** | **4** | **48** | **48** | **13** | **68** | **19** |
| 22 | औरंगाबाद विभाग | औरंगाबाद | | | | | 1 | 9 | 9 | 3 | 9 | 3 |
| 23 | | जालना | | | | | 1 | 8 | 8 | 2 | 8 | 2 |
| 24 | | परभणी | परभणी | 65 | 6 | 2 | 1 | 9 | 9 | 3 | 15 | 5 |
| 25 | | हिंगोली | | | | | 1 | 5 | 5 | 2 | 5 | 2 |
| 26 | | बीड | | | | | 1 | 11 | 11 | 3 | 11 | 3 |
| 27 | | नांदेड | | | | | 1 | 16 | 16 | 4 | 16 | 4 |
| 29 | | उस्मानाबाद | | | | | 1 | 8 | 8 | 2 | 8 | 2 |
| 29 | | लातूर | लातूर | 70 | 7 | 2 | 1 | 10 | 10 | 3 | 17 | 5 |
| | | **एकूण** | | **135** | **13** | **4** | **8** | **76** | **76** | **22** | **89** | **26** |
| | **GRAND TOTAL** | | | **1615** | **159** | **50** | **26** | **296** | **296** | **82** | **455** | **132** |